प्रीती सावंत दळवी



# गुंतता हृदय हे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

www.esahity.com
esahity@gmail.com

# गुंतता हृदय हे!!

## पर्व १

लेखिका : प्रीती सावंत-दळवी

# गुंतता हृदय हे!!

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत.  मागत आहे दाद.
### साद आहे आमची.  हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही.  प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.   प्रामाणिक मत असावे.  ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते.  मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गुंतता हृदय हे!!

लेखिका : प्रीती सावंत-दळवी

पत्ता : बी/२०५, धुरी क्लासिक, विद्यामंदिर मार्ग, अंबाडी रोड, वसई (w) - ४०१२०२

Email id :- pspitu2@gmail.com

Link of My FB official page for read more stories written by me :

https://m.facebook.com/preetisawantdalvi/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १४ फ़ेब्रुवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**मनोगतः-**



मला वाचनाची खूपच आवड म्हणजे अगदी लहानपणापासूनच. अर्थात तो वारसा मला माझ्या आईकडून आणि आजीकडून मिळाला. त्या दोघींनाही वाचनाची खूप आवड. माझे मराठी इतके चांगले असल्याचे सगळे श्रेय मी माझ्या आजीला देते. तिच्यामुळेच माझे उच्चार आणि लेखन इतके चांगले आहे.

मी मराठी माध्यमातून शिकल्यामुळे मराठी विषय हा नेहमीच जवळचा. मला गद्य भाग जास्त आवडायचा. कोणताही धडा वाचताना त्याआधी तो धडा ज्या पुस्तकातून घेतला आहे त्या पुस्तकाचे नाव आणि लेखकाचे नाव हे दोन्ही दिले जायचे. खूप वाटायचे पुढे काय असेल, ह्या कथेच्या.

असो, यानंतर जेव्हा मी महाविद्यालयात गेल्यावर वाचनालयात माझे नाव नोंदवले. त्यानंतर खऱ्या अर्थाने माझी नवनवीन पुस्तके आणि नवनवीन लेखकांशी ओळख झाली. त्यामध्ये लेखक नारायण धारप हे नाव खूपच महत्वाचे आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्या गूढ, रहस्य, वैज्ञानिक विषयांवर असतात. त्यांचे एक पुस्तक, नंतर दुसरे असे करता करता मी त्यांची भरपूर पुस्तके वाचली.

त्यामुळेच कदाचित मला ही गूढ आणि रहस्यमय कथा लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि मी "सैतानी पेटी" हे माझे पहिले पुस्तक लिहू शकले. तसेच मी ईसहित्य टीमचे ही खूप खूप आभार मानते.. कारण त्यांनी माझे पहिले पुस्तक प्रकाशित करायला मला मदत केली..

तसेच माझे आई-वडील, सासू-सासरे, माझा नवरा, माझी भावंडे, माझी नणंद या सर्वांचे सुद्धा मी आभार मानीन कारण, त्यांनी मला कथा लिहिण्यास प्रोत्साहित केले आणि त्याचबरोबर वेळोवेळी योग्य ते मार्गदर्शन ही केले.  म्हणून कदाचित मी ह्या कथा लिहू शकली.

मी सर्व वाचकांची सुद्धा आभारी आहे की, त्यांनी माझ्या पहिल्या "सैतानी पेटी" या पुस्तकाला भरभरून प्रतिसाद दिला आणि मला अजून कथा लिहिण्यास प्रोत्साहित केले

माझ्या दुसरे पुस्तक हे एक प्रेम कथेवर आधारित आहे.  ह्या पुस्तकाचे नाव आहे.. "गुंतता हृदय हे ( पर्व १)"

प्रेम हे प्रत्येकाला कधीनाकधी होतंच.. असा कोणी व्यक्ती नसेल ज्याला कधी कोणावर प्रेम झालं नसेल.. ही कथा आर्या,समीर, अनिश आणि एक सरप्राईज व्यक्तीरेखा RJ अमेय यांच्यावर आधारित आहे..

कथा वाचता वाचता कधी तुम्ही ह्या कथेत गुंतत जाल.. तुम्हालाच नाही कळणार.. मी लिहिलेली ही कथा तुम्हा वाचकांना कशी वाटली.. हे मला जरूर कळवा.. तसेच मी लिहिलेल्या इतर कथा वाचण्यासाठी मी माझ्या official FB page ची लिंक सुद्धा जोडत आहे..

धन्यवाद🙏

प्रीती सावंत-दळवी

# गुंतता हृदय हे!! पर्व १

ही कादंबरी काल्पनिक असून यातील व्यक्ती वा स्थळांचे साम्य इतर कुणाशी आढळून आल्यास तो योगायोग समजावा

# (भाग १)

गुड मॉर्निंग!! मुंबई!!

मी आहे तुमचा सर्वांचा लाडका RJ अमेय..

सो, चला आजच्या दिवसाची सुरुवात करूया ह्या सुंदर अश्या गाण्याने..

"पाहिले न मी तुला तू मला न पाहिले

ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

पाहिले न मी तुला 🎶🎶🎶🎶"

मुबंईमधली सात मजली इमारत.. आणि तिथे सहाव्या मजल्यावर राहणारे जोशी कुटूंब... घरात माणसे ४.. सुभाष जोशी, त्यांची पत्नी सुकन्या जोशी, मुलगा ऋग्वेद जोशी आणि मुलगी आर्या जोशी..

सुभाष काका बँकेत मॅनेजर आणि सुकन्या काकू..  त्या गृहिणी आहेत, तसेच ऋग्वेद ११वीत कॉलेजमध्ये शिकत आहे आणि आर्या एका कॉर्पोरेट ऑफिसमध्ये कामाला आहे.. दोन स्वतंत्र खोल्या, लिविंगरूम आणि किचन असलेले प्रशस्त घर..

सध्या सकाळ झाली आहे. काका आणि ऋग्वेद आपापल्या कामाला निघून गेले आहेत आणि रेडिओ वर RJ अमेयचा "गुंतता हृदय हे" हा कार्यक्रम सुरू आहे.. काकूंचा अगदी आवडता कार्यक्रम... आणि अमेय चा आवाज सुद्धा बरं का.. तो ऐकल्याशिवाय ह्या घरची सकाळ होतच नाही..

पण हो, तो ऐकायला फक्त काकू आणि आर्याचं हजर असतात.. म्हणजे काय आहे ना!! आमच्या आर्याचे ऑफिस सकाळी १० वाजताचं. आणि हा कार्यक्रम सकाळी ८ वाजता लागतो.. तोपर्यंत काका आणि ऋग्वेद घरातून निघालेले असतात..

असो, आर्या झोपली आहे आणि झोपेतच सध्या रेडिओ वर सुरू असलेल गाणे ऐकत आहे.. जणूकाही तिला स्वप्नच पडलं आहे.. अमेयच😀

गाणे कोणते??अहो तेच हो ते.. मगाशी चालू होते ते..

"पाहिले न मी तुला तू मला न पाहिले

ना कळे कधी कुठे मन वेडे गुंतले

पाहिले न मी तुला 🎶🎶🎶🎶"

"वाह! किती रोमॅंटिक गाणे आहे आणि त्याचबरोबरचा अमेय चा हृदय चिरणारा आवाज! हा कसा असेल ना दिसायला🤔.. काश तो माझ्यासमोर येईल आणि... 😍😍" आर्या स्वप्नचं बघत असते की, अचानक...

"आर्या.. अग ये आर्या!!! उठ लवकर बाळ, उशिर होईल नाहीतर ऑफिसला जायला.. " काकूंनी आवाज दिला..

"अमेय.... ????? आई ग.. 🤦‍♀️.. .... हो ग आई, उठतेय.. ही आई पण ना, मला स्वप्न ही बघू देत नाही.. जाऊदेत आता उठायलाच हवे.. नाहीतर late मार्क लागायचा, आणि तो बॉस.. तो तर खाऊनच टाकेल मला.. " आर्या स्वतःशीच पुटपुटली.

काही वेळानंतर.....

"अग नाश्ता तर कर नीट, काय हे नेहमीचंच तुझं आर्या.  घाईघाईत नीट नाश्ता पण नाही करायचा.. अग कुठे जातेयस.. संपव आधी ते सगळे.. आर्या.. " काकू म्हणाल्या..

"आई pls मला खूप उशीर झालाय.. माझी ट्रेन मिस होईल.. चल बाय.. हे apple घेऊन जाते.. बाय.. लव्ह यु आई" आर्या म्हणाली..

काही वेळानंतर..

"रिक्षा...... " रिक्षात बसल्यावर,  "हे इअरफोन कुठे गेले.. हा मिळाले.. " आर्या पुटपुटली..

"कितीदा नव्याने तुला आठवावे

डोळयातले पाणी नव्याने वाहावे.. 🎶🎶

कितीदा झुरावे तुझ्याचसाठी,

कितीदा म्हणावे तुझे गीत ओठी,🎶

कितीदा झुरावे तुझ्याचसाठी,

कितीदा म्हणावे तुझे गीत ओठी,🎶

कितीदा सुकून पुन्हा फुलावे...

कितीदा नव्याने तुला आठवावे

डोळयातले पाणी नव्याने वाहावे... 🎶🎶🎶🎶🎶

"वाह!!किती मस्त गाणं.. " आर्या मनातच म्हणाली..

तेवढ्यात स्टेशन आले..  इतक्यात अचानक,

"हॅलो फ्रेंड्स, तर कसा वाटला तुम्हाला आजचा एपिसोड.. मला नक्की कळवा.. आणि अजून एक.. मी तुम्हाला प्रॉमिस केलेलं त्याप्रमाणे तुमच्यासाठी मला भेटायची एक संधी मी तुम्हाला देत आहे.. हा पण.. त्यासाठी तुम्हाला मला एक रोमॅंटिक अशी स्टोरी ई-मेल द्वारे लिहून पाठवायची आहे.. ज्याची स्टोरी मला सगळ्यात जास्त आवडेल.. त्यालाच मला भेटायची संधी मिळेल.. सो bye.. take care.. उद्या नक्की भेटू.. "

अमेय म्हणाला.

"ओ मॅडम, पैसे तर द्या.. मग ऐका की, गाणी.. ओ मॅडम.. कुठून कुठून भेटतात सकाळी" रिक्षावाला म्हणाला.

आर्या भानावर येत.. " अरे हो, सॉरी दादा.. हे घ्या तुमचे पैसे". तिने पटकन जीभ बाहेर काढली..

स्निग्धा!!!!!स्निग्धा!!!!!

स्निग्धा ही आर्याची ऑफिस friend.. रोज आर्या आणि ती एकत्रच ऑफिस ला जातात..

"आग ये बये, किती तो उशीर, आजपण लेटमार्क लागणार वाटते.. तू पण ना, आजपण तो अमेयच असेल ना उशिरा येण्याच कारण, फुकणीच्याला एकदा खवडाच देणार आहे मी" स्निग्धा म्हणाली.

"अग हो, हो, किती रागवशील.. चल निघू.. बाकीचा राग ट्रेन मध्ये काढ.. " आर्या म्हणाली..

दोघी ऑफिसला पोहचतात..

"Hi गर्ल्स, आजपण उशीर, एक काम करा, उद्यापासून येऊच नका, म्हणजे इथवर येण्याचा त्रास वाचेल.. नो excuses pls" बॉस म्हणाले.

हे आहेत अस्मिता pvt ltd चे सर्वेसर्वा शेखर प्रधान.. ते कितीही ह्या दोघींना बोलले.. तरी त्यांना हे पण माहीत आहे की, ह्या दोघी टॉप ranker employees आहेत कंपनीच्या.. तसेच त्या दोघींना ही ह्याची कल्पना आहे.. की, शेवटी त्यांचीच मदत लागते सरांना.. 😁

Here is come, the dashing, handsome आणि शेखरचा खास employee समीर पटवर्धन.. सगळ्या ऑफिस मधल्या मुली समीर वर मरतात.. अगदी स्निग्धा सुद्धा.. पण आपली आर्या त्याच्याकडे ढुंकूनही बघत नाही..

बिलकुल नाही.. तुम्ही जे समजताय तसे काही होणार नाहीये.. म्हणजे आर्या आणि समीर ची लव्ह स्टोरी.. वगैरे वगैरे.. pls. तसं कसं होईल🤦‍♀️

तुम्ही एक विसारताय.. आपला RJ अमेय.. 😍

आता तर कुठे सुरुवात आहे..

# गुंतता हृदय हे!! (भाग २)

"Woww किती handsome आहे ग हा!!, त्याची बॉडी बघ ना.. हाये..... 😍😍" स्निग्धा म्हणाली.

"चूप ग तू.. इतका पण काही खास नाहीये तो दिसायला... काय तुम्ही सगळ्या मुली मरता त्याच्यावर मला कळतच नाही" आर्या म्हणाली..

"असुदेत, अटलिस्ट मी ह्याला बघू शकते.. हाथ ही लावू शकते.. तुझ्या त्या अमेय सारखं नाही .. बघावे तेव्हा रेकत असतो रेडीओ वर" स्निग्धा म्हणाली.

"ए आता बस हा, अमेय कुठे मधून आला आणि रेकतो काय ग😠 किती गोड आवाज आहे त्याचा😍😍" आर्या उत्तरली..

"चल आता काम करूयात नाहीतर येईल आपला बॉस कान खायला" आर्या म्हणते आणि मग दोघीही खळखळून हसतात.

रात्री झोपताना आर्या मनातल्या मनात बोलत असते आणि काहीतरी लिहीत असते .

"कशी बरं सुरुवात करू, रोमँटिक स्टोरी लिहायला🤔

एक मुलगा आणि मुलगी.. नको नको खूपच टिपिकल वाटतंय.. मग, हा..... एक राजकुमारी... ईई.. काहीतरीच वाटतंय.. " आणि बघता बघता सगळ्या रूमभर कागद पडलेले असतात.. गोळा करून फेकलेले..

तेवढ्यात आई रूममध्ये येते आणि ओरडते,"आर्या काय ही खोलीची अवस्था.. झोपायचे सोडून कचरा कसला करतेयस.. ऐकतेयस का माझं, आर्या"

आर्या दचकले आणि म्हणते, "बापरे, सॉरी आई, मी उचलते सगळे कागद, अग ऑफिसचे काम करत होती.. रोमँटिक... "  मधेच अडखळत म्हणते, "म्हणजे माझ्या ऑफिस प्रोजेक्ट साठी tagline शोधत होती, सो भानच नाही राहिले"

"ठीक आहे, ते कागद उचलून वेळेवर झोप.  गुड नाईट" असे बोलून आई निघून जाते झोपायला.

"हुश्श.. बापरे नशीब आईने काही वाचले नाही.. " झोपते आता.

दुसऱ्या दिवशी,

"गुडमॉर्निंग मुंबई!!

||गणपती बाप्पा मोरया||

मी तुमचा सर्वांचा लाडका RJ अमेय.. तुमचे सर्वांचे स्वागत आहे "गुंतता हृदय हे" च्या नवीन एपिसोड मध्ये..

आपल्या लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन झालंय.. सगळीकडे कसं प्रसन्न वातावरण आहे.. कुठे धूप, अगरबत्ती चा सुवास पसरलाय तर कुठे टाळ, घंटीचा नाद घुमतोय.. आणि त्यामध्ये हा बरसणारा पाऊस..

मन कसं आठवणींमध्ये हरवून जाते.. आणि मग बोलू लागते,

दिस चार झाले मन, पाखरू होऊन

पानपान आर्त आणि झाड बावरून||

सांजवेळी जेव्हा येई आठव आठव

दूर कुठे मंदिरात होई घंटारव

उभा अंगावर राही काटा सरसरून||

नकळत आठवणी जसे विसरले

वाटेवर इथे तसे ठसे उमटले

दूर वेडेपिसे सूर सनईभरून||

झाला जरी शिडकावा धुंद पावसाचा

आता जरी आला इथे ऋतु वसंताचा||

सो guys कसे वाटले गाणं??

आता आपल्या contest बद्दल थोडंस.

कसे चाललय लिखाण, मला भेटायचे आहे की नाही??

सो उचला पेन आणि लिहा रोमॅंटिक स्टोरी.. आणि मिळवा चान्स मला म्हणजे तुमच्या सर्वांच्या आवडत्या RJ अमेय ला भेटण्याचा!! परवा शेवटची तारीख आहे तुमच्या स्टोरी submission ची.

सो भेटूया उद्याच्या एपिसोड मध्ये..

Siya, बाय आणि yessssss

||गणपती बाप्पा मोरया||

"Wooww सो रोमॅंटिक, माझी सकाळ तुझ्यापासूनच होते आणि रात्र तुझ्या आठवणींमध्ये जाते, वाह!किती छान बोलतो हा" आर्या पुटपुटते.

"आर्या उठ बघू. आज पहिला दिवस गणपतीचा.. आपल्याला दादांकडे जायचंय.. तुझे बाबा आणि ऋग्वेद कधीच तयार झालेत.. तू पटकन तयार हो.. मग निघू आपण. " आई म्हणाली.

"हो ग आई, उठतेय मी" आळस देत आर्या उठली.

सगळे जण सुयश जोशी (उर्फ दादा) ह्याच्या घरी म्हणजे आर्याच्या मोठ्या काकांच्या घरी पोहचले.. दरवर्षी जोशींचा गणपती दीड दिवसांसाठी दादांच्याच घरी येतो.. सगळे जोशी कुटूंब दीड दिवस इथेच असते.. गणपती बाप्पाची सेवा करायला.. आणि गणपती बाप्पाला निरोप देऊन सगळे आपापल्या घरी परतात.

"कसा दिवस गेला कळलंही नाही.. आज गणपती बाप्पांचे विसर्जनही झाले.. अगदी भरून आलेलं हो निरोप देताना" काकू काकांना म्हणाल्या..

"हो ग, दिवस कसे जातात समजतच नाही" काका उत्तरले.

"आर्या, अग ए आर्या, थोड्यावेळाने आपल्याला साठेकाकूंबरोबर आमच्या पाककलेच्या क्लासच्या गोडबोले काकूंकडे जायचंय गणपती दर्शनाला. त्यांचा गणपती ५ दिवसांचा असतो.."

काकू म्हणाल्या.

"काय ग आई, आताच तर आलो विसर्जन करून.. थांब ना थोडावेळ.. नाहीतर तूच जा ना. सांगा ना हो बाबा हिला" आर्या म्हणाली.

"थकली असेल ग ती, राहुदेत तिला घरात, तूच जाऊन ये सुकू." काका म्हणाले.

"अहो, असे काय करताय, आर्या चल तयार हो, लगेच येऊ आपण" काकू म्हणाल्या.

काही वेळानंतर, आर्या, काकू आणि साठे काकू गोडबोले काकूंच्या घरी पोहचल्या.

आर्या तर त्यांचे घर पाहून भारावून गेली. गणपतीची आरास खूपच सुंदर केलेली होती.. सगळीकडे खूप प्रसन्न वातावरण होते..

काकूंनी आर्याची ओळख करून दिली.. आर्याने फिकट गुलाबी रंगाचा ड्रेस घातला होता, त्यावर झुमके आणि कपाळावर diamand ची बिंदी, तसेच केस एक क्लिप लावून मोकळे सोडले होते, ओठांवर हलकी गुलाबी लिपस्टिक लावली होती.  आर्या आज खूपच उठून दिसत होती..

इतक्यात तिथे अनिश ची एन्ट्री झाली.  अनिश गोडबोले काकूंचा एकुलता एक मुलगा. त्याने आकाशी रंगाचा सदरा घातला होता.. दिसायला देखणा, रुबाबदार.. आर्या त्याला बघतच राहिली.. त्याची नजर ही आर्या वर खिळून होती.. तो तिच्या सोज्वळ रूपावर पाहताच क्षणी फिदा झाला होता.

इतक्यात गोडबोले काकू म्हणाल्या, "हा माझा मुलगा अनिश.  रेडिओवर कामाला असतो"

रेडिओ?????????

# गुंतता हृदय हे!! (भाग ३)

"अनिश ह्या साठे काकू आणि या जोशी काकू व ही त्यांची मुलगी आर्या', गोडबोले काकू म्हणाल्या.

अनिश ने दोन्ही काकूंना नमस्कार केला आणि आर्याला hi म्हटले.

आर्या ची नजर अनिश वरून हटतच नव्हती..

इतक्यात जोशी काकू म्हणाल्या, "अरे, रेडिओवर म्हणजे तू RJ अमेय ला ओळखत असशील ना? "

"मी न चुकता त्याचा प्रोग्राम ऐकते.. कोणता ग तो आर्या? हा "गुंतता हृदय हे", किती सुंदर असतो प्रोग्रॅम!! त्यातली मराठी गाणी तर खूपच सुंदर आणि त्याचा आवाज तर!!"

काकूंना मध्येच थांबवत आर्या म्हणाली, " आई!! पुरे झाले त्या अमेय च कौतुक".

इतक्यात साठे काकू म्हणाल्या," मी पण ऐकते तो प्रोग्राम.. फारच छान आवाज आहे हो अमेयचा. अनिश तु ओळखतोस का रे त्याला?"

अनिश मंद हसला आणि म्हणाला, "नाही, मी पण त्याचा आवाजच ऐकलाय. त्याला कधी पाहिले नाही.. कारण मी हल्लीच रेडिओ वर कामाला लागलोय.. आणि माझी ऑफिस ची वेळ उशिराची असल्यामुळे.. त्याला भेटण्याचा योग अजून तरी आला नाही. हा पण जेव्हा पण मी त्याला भेटेन, तुमचा मेसेज नक्की देईन"

आर्या ला फारच बोर झाले होते.. ती हा विषय संपवण्यासाठी अचानक म्हणाली, "वाह!! काकू तुमचे घर खुपच छान आहे, मी बघू शकते का?"

"नक्कीच, त्यात काय विचारायचं एवढे.  अनिश जा रे आर्याला आपले घर दाखव.. "

अनिश आर्याला घेऊन घर दाखवायला घेऊन गेला व म्हणाला," तू लिविंग रूम तर बघितलास..  आता हा उजवीकडे किचन आणि हो ही डावी कडची माझी रूम आणि हा समोरचा मास्टर बेडरूम हा आई बाबांचा आहे. "

"वाह!!खूपच मस्त आहे तुझं घर i mean तुमचं घर!!" मधेच तोडत अनिश म्हणाला की, "its ok.  तू बोललंस तरी चालेल मला".

"तुझं घर खूप छान आहे.. woww तू paintings पण काढतोस?" आर्या म्हणाली.

"ते आपले असचं वेळ जात नसेल तेव्हा काहीतरी रेखाटतो.   मी काही प्रोफेशनल पेंटर नाही. " अनिश म्हणाला.

"तरी फारच छान आहेत paintings.. एखाद्या दिवशी वेळ काढून नक्की बघायला येईन.." आर्या म्हणाली.

त्यावर अनिश काही बोलणारच होता, तेवढ्यात जोशी काकूंनी आर्याला हाक मारली.

त्यामुळे त्या दोघांचं बोलणे अर्धवटच राहिले.. गोडबोले काकू आणि अनिश चा निरोप घेऊन जोशी काकू, आर्या आणि साठे काकू घरी जायला निघाल्या..

घरी आल्यावर पण आर्या च्या मनातून अनिश ची छबी जातच नव्हती.. आणि इथे ही असाच काहीतरी अनिश च झाल होतं..

कहते है ना, एक नजर ही काम कर गयी।।😍

चला, दुसऱ्या दिवशी सगळे आपापल्या कामाला लागले.. सकाळीच जोशी काकांनी काकूंना आपण संध्याकाळी एरिया मधला सार्वजनिक गणपती बघायला जाऊ असे सांगितले.. आणि आर्या ला ही बरोबर नेऊ म्हणून तिला तयारीत राहायला सांग असा मेसेज ही दिला.

ऋग्वेद तर मित्रांच्या घरचे गणेश उस्तव करण्यात व्यस्त होता.. काकांना माहीत होते की, हा ११ दिवस काही सापडायचा नाही. म्हणून त्यांनी आर्यालाच मेसेज दिला..

संध्याकाळी सर्व जोशी कुटूंब जवळच्या गणपती मंडळात गेले.. पाया पडून निघणार इतक्यात गोडबोले कुटूंब ही तिथे आले होते.. आर्याची नजर अनिश ला शोधत होती.. आणि हे गोडबोले काकूंनी हेरले.. त्यांना आर्या बघताक्षणी आवडली होती.. त्यांना आर्यासारखीच बायको हवी होती अनिशसाठी.

इतक्यात, जोशी काकू म्हणाल्या, "अनिश कुठेय? तो नाही आला?"

"त्याच्या मित्राच्या घरी गेलाय तो गणपतीसाठी.. इथे आज सत्यनारायणाची पूजा म्हणून मी म्हटले, पटकन पाया पडून येते.. घरी माझी जाऊ आहे. म्हणून जमलं. नाहीतर घरात गणपती असताना कुठेच जायची सवड मिळत नाही. " गोडबोले काकू म्हणाल्या.

"हो ना. ते तर आहेच. चला आम्ही निघतो" जोशी काकू उत्तरल्या.

इतक्यात अनिश तिथे आला.

"आई, अग तू इथे आहेस. चल ना लवकर घरी माझे सगळे कामावरचे सहकारी आले आहेत घरी.. त्यांचा अचानक फोन आला. काकू बोलली तू इथे ली आहेस, म्हणून तुला बोलवायला आलो. "

बोलता बोलता त्याची नजर जोशी कुटूंबाकडे गेली. आर्या ला बघताच तो बघतच राहिला..

आर्याने मेहेंदी कलरचा कुर्ता घातला होता, त्यावर मॅचिंग झुमके, bangals.. आणि क्लिप लावून सोडलेले मोकळे केस.. कपाळावर diamond टिकली.. ती खूपच सुंदर दिसत होती..

आर्या ची कळी ही अनिश ला बघताच लगेच खुलली..

ये तो होना ही था।।😍

इतक्यात जोशी काकू पटकन म्हणाल्या," अनिश RJ अमेय पण आला आहे का? असेल तर घेऊन ये की, त्याला इथे.. आम्ही सर्व भेटू"

अनिश मंद हसला.

"काकू तो आज नाही येऊ शकला.. त्याच्या घरी पण गणपती असतो, जर तो आला तर मी नक्कीच कळवेन".

आर्याकडे बघत बघत तो काकूंना म्हणाला," काकू तुमचा नंबर मिळाला असता तर बरं झालं असतं कळवायला?"

"हो ना नक्की. तू आर्या चा नंबर घेऊन ठेव आणि तिलाच मेसेज कर, ते व्हाट्सएप का काय त्यावर" जोशी काकू उत्तरल्या.

आर्या आणि अनिशने आपापले नंबर exchange केले.

इतक्यात गोडबोले काकूंनी गणपती जवळ मनातल्या मनात आर्याच माझ्या घरची सून होऊ देत असे साकडे घातले..

व सगळे आपआपल्या घरी निघून गेले..

घरी आल्यावरही आर्याने पटापट स्वतःचे चांगले फोटो व्हाट्सएपच्या स्टेटस् वर ठेवले.. जेणेकरुन अनिश ते फोटो बघेल व त्यावर काही तरी कंमेंट करेल आणि त्या दोघांचे बोलणे सुरू होईल..

त्यादिवशी अनिशचे सहकारी उशिरा गेले व दुसऱ्या दिवशी विसर्जन असल्यामुळे अनिश ही लवकर झोपी गेला..

दुसऱ्या दिवशी सकाळी.. जोशींच्या घरी...

||गुड मॉर्निंग, मुबंई||

मी आहे तुमचा सर्वांचा आवडता RJ अमेय.

सो, फ्रेंड्स आज स्टोरी सबमिशन ची शेवटची तारीख आहे.

ज्यांनी अजूनही ही स्टोरी पाठवली नसेल त्यांनी संध्याकाळी ५ वाजायच्या आधी स्टोरी सबमिट करावी..

जेणेकरून भाग्यवान विजेत्यांना मला भेटायची संधी मिळेल..

अमेय चा आवाज ऐकताच आर्या खाडकन जागी झाली आणि मनातच पुटपुटली, "लास्ट date.. पण मी तर स्टोरी लिहिलीच नाही.. म्हणजे मी अमेय ला कधीच नाही भेटू शकणार???"

इतक्यात तिच्या मेसेज ची बीप वाजली आणि तो मेसेज होता अनिश चा..

# गुंतता ह्रदय हे!! (भाग ४)

आर्याने फोन मधला मेसेज बघितला त्यात लिहिले होते,

"गुड मॉर्निंग!!"

ती स्वतःशीच पुटपुटली, "फक्त गुड मॉर्निंग!!"

मग तिने पण रिटर्न गुड मॉर्निंग मेसेज सेंड केला..

तर समोरून अनिशने फक्त एक स्माईली सेंड केला..

"बस इतकंच" आर्या थोडीशी हिरमुसली..

इतक्यात तिचं लक्ष घड्याळाकडे गेले.. ती पटकन आवरून ऑफिसला पळाली.

स्निग्धाला बरं नसल्यामुळे ती आज ऑफिसला येऊ शकणार नव्हती.. मग काय आर्या एकटीच ऑफिसला निघाली..

आज रोजच्यापेक्षा थोडी लवकरच आर्या ऑफिसला पोहचली.. सगळे सहकारी आपापल्या वेळेनुसार ऑफिसमध्ये येत होते.. आर्या कॉफी घेण्यासाठी तिच्या ऑफीसच्या कँटीनमध्ये गेली.. तर तिथे समीर एकटाच कॉफी पीत बसलेला होता.  त्याच्या लॅपटॉप वर काहीतरी काम करत..

तसे तर आर्याचं समीरशी जास्त जमायचं नाही.. जमणार पण कसं, समीर बघावे तेव्हा ऑफिसमधल्या मुलींच्या घोळक्यात!!

त्यात स्निग्धा पण त्याच्यावर फिदा.. म्हणून का कोणास ठाऊक आर्याला तो अजिबात आवडत नसे..

पण आज त्याला एकटे बघून असेल की काय माहीत, पण आर्याला त्याच्याशी बोलावसं वाटत होतं..

पण नंतर तिने विचार केला, "नको बाबा, मी स्वतः हाक मारली तर उगाच चण्याच्या झाडावर चढेल.  जाऊ देत"आणि ती दुसऱ्या एका टेबलवर बसून मोबाइल चाळत कॉफी पीत बसली..

इतक्यात, समीरच लक्ष तिच्याकडे गेलं आणि लागलीच त्याने आर्याला हाक मारली व चेष्टेने म्हणाला, "अरे आज तू एकटीच, तुम्ही GF कुठेय? I mean स्निग्धा? सदानकदा तुझ्या अवतीभवतीच असते.  म्हणून विचारलं"

आर्याने रागात त्याच्याकडे बघितले.. पण त्याच्याशी नजरानजर होताच तिचा राग का कोण जाणे एकदम निवळला.

ती म्हणाली, "स्निग्धा ला बरं नाही आहे, म्हणून ती नाही आली.  पण आज तू इतक्या लवकर?"

चक्क आर्या आपल्याशी बोलत आहे याचा आधी समीर ला विश्वासच बसत नव्हता.. पण त्याने स्वतःला सावरलं..

आणि म्हणाला, "अगं, आज एका क्लायंट बरोबर मीटिंग आहे.. म्हणून थोडे preparation साठी लवकर आलो.. जाईन आता ५-१० मिनिटात. "

तो पुढे म्हणाला,"आज कधी नवे ते, तू पण तर लवकर आलीयेस.  काही खास कारण? तुझी पण मीटिंग वगैरे??"

"तसे काही नाही.  Anywy you carry on.  मी निघते.. मला भरपूर काम आहे.. पुन्हा बोलू bye" असे बोलून आर्या कँटीन मधून निघून गेली..

आजचा दिवस रोजच्यापेक्षा खूपच बोर होता स्निग्धा नव्हती ना!!

ती असली की, नेहमी ऑफिसमध्ये आवाज,गोंधळ असायचाच..

तोपर्यंत दुपार ही झाली.. तिला लंच एकट्याने करायलाही बोरं झालं होतं. पण भूक पण लागली होती म्हणून ती लंच साठी कँटीन मध्ये निघाली......

इतक्यात तिला शेखर म्हणजेच तिच्या बॉसचा फोन आला आणि त्याने तिला कॅबिन मध्ये तातडीने बोलवले.

आर्याने लंचबॉक्स पुन्हा आत ठेवला आणि ती शेखरच्या कॅबिनमध्ये गेली.

शेखरने आर्याच्या हातात एका नवीन प्रोजेक्ट ची फाईल दिली आणि ह्या प्रोजेक्टचा इंचार्ज तिला बनविले पण तिला ह्या प्रोजेक्ट मध्ये समीर मदत करेल.. हे ही सांगितले.

आर्याला खूपच आनंद झाला.. कारण हा तिचा पहिला असा प्रोजेक्ट होता जिथे ती इंचार्ज होती.. म्हणजे ह्या प्रोजेक्टसंबंधीचे सगळे निर्णय ती घेणार होती..

पण ह्या आनंदावर काही सेकंदातच विरजन पडले, जेव्हा तिला कळले की हा प्रोजेक्ट तिला समीर बरोबर करायचा आहे.

"झाले म्हणजे पुन्हा सगळं क्रेडिट हाच घेऊन जाणार", आर्या मनात पुटपुटली.

तेवढ्यात समीर पण तिथे आला व त्याने शेखर आणि आर्याला आजच्या मीटिंगचे प्रोजेक्टबद्दलचे डिटेल्स दिले.. आणि लंच नंतर त्यावर डिस्कशन करू असे सांगितले. समीर आणि आर्या दोघेही आपापल्या डेस्ककडे निघाले..

हो, तुम्ही एकदम बरोबर विचार केलात!!

ती आजची सकाळची मीटिंग त्याच प्रोजेक्ट संबंधात होती.. जिथे समीर गेला होता.

आर्या स्वतःच्या डेस्कजवळ आली, इतक्यात तिचे लक्ष समीरकडे गेले.. तो ही तिलाच बघत होता.. त्याने तिला छानशी स्माईल दिली..

आर्याला काहीच कळत नव्हते की, नक्की काय चालयल!!

ती बॉटलमधले पाणी घटाघटा प्यायली आणि विचार करत मनातच म्हणाली, "आज स्निग्धा काय नाही आली तर कायकाय घडले ऑफिसमध्ये आणि तो प्रोजेक्ट?? त्याबद्दल सगळं जर समीरला माहीत आहे तर मग मी त्या प्रोजेक्टची इंचार्ज कशी? बापरे, डोक्याचा भुगा होईल आता.  जाऊ देत.. आधी लंच करू मग बघू. "

असे बोलून ती कँटीन मध्ये लंच साठी गेली..

तर तिथे समीर पण तिला जॉईन झाला लंच साठी..

तिला समीरशी काय बोलावे हे सुचत नव्हते..

समीरला ही हे कळले..

मग काय त्यानेच बोलणे सुरू केले आणि आर्याला comfortable केले..

कधी नव्हे ते आज दोघेही एकत्र लंच करत खूप बोलले..

आर्याचे समीरबद्दल खूप सारे गैरसमज झालेले ते सगळे हळूहळू क्लिअर होत होते..

त्यांनतर त्यांची प्रोजेक्ट संबंधात शेखर बरोबर सुद्धा मीटिंग झाली आणि खूप साऱ्या महत्वाच्या माहितीवर ही चर्चा झाली..

आज आर्याला दुपारनंतर फोन बघायची पण फुरसत नव्हती.. ती घरी सुद्धा उशिरा आली.. आणि अजून काही दिवस तिला असाच उशीर होईल असेही तिने घरी सांगितले.. आणि सरळ झोपी गेली..

दुसऱ्या दिवशी तिने सकाळीच स्निग्धाला फोन केला.. तर तिच्या आईने मेसेज दिला की, स्निग्धा अजून तरी ३-४ दिवस ऑफिसला येऊ शकणार नाही.

मग काय आजपण आर्या एकटीच ऑफिसमध्ये निघाली.. आज तिला ऑफिसमध्ये बोर होण्याचं कारणच नव्हत, ते कारण म्हणजे तिचा प्रोजेक्ट पार्टनर, समीर पटवर्धन.. नाव जसे डॅशिंग, तसाच तो सुद्धा... कोणीही मुलगी बघताक्षणीच प्रेमात पडेल असा..

आर्या समीरबरोबरच काम खूपच एन्जॉय करत होती.. तो खूपच हुशार होता.. म्हणूनच तर तो अस्मिता pvt ltd चा टॉप एम्प्लॉयी होता.. प्रोजेक्टच काम अजून तरी २-३ दिवस चालणार होते.. शेखरने त्याच्यासाठी एक वेगळी कॅबिन ही त्या दोघांना दिली होती.. त्यामुळे दोघांच्या कॉफी पासून ते जेवणापर्यंतचा सगळा वेळ तिथेच जात होता..

पण यामुळे ऑफिसमध्ये त्यांची चर्चा खूपच गरम होती.. ऑफीसमधल्या मुली तर आर्यावर खुपच जळफळत होत्या.. आर्याला ही हे कळत होते.. पण आर्याला त्याची काहीच फिकर नव्हती.. तिला फक्त तिच काम परफेक्ट व्हावे असे वाटत होते.

पण ही झाली आर्याची बाजू पण आपल्या समीरच काय?? ते तरी विचार करा..

समीर तर आर्यावर तिला पाहिलेल्या पहिल्या दिवसापासून फिदा होता.. पण आर्याशी कधी मोकळेपणाने बोलायची संधी त्याला मिळालीच नव्हती..

नेहमी ती स्निग्धा अगदी ग्लू सारखी चिकटून बसलेली असे आर्याशी.. मग बोलणार पण कधी.. म्हणून त्याने शेखरला राजी करून आर्याला ह्या प्रोजेक्टचं इंचार्ज बनवायला सांगितले होते..

सगळे काही त्याच्या प्लॅननुसारच सुरू होते.. आणि सोने पे सुहागा म्हणजे स्निग्धा आजारी पडली त्यामुळे त्याला या ३-४ दिवसात आर्याच्या अजून जवळ जायला मिळाले होते.

तसेच, तो प्रोजेक्ट पूर्ण झाल्यावर आर्याला मागणी ही घालणार होता.. मग आर्याच उत्तर काहीही असो.. त्याला त्याची फिकर नव्हती.. पण तो अजून हे प्रेम मनात लपवून ठेवू शकत नव्हता..

इथे अनिशला समजत नव्हते की, आर्याला काय झालाय?

कारण न चुकता तो रोज आर्याला 'गुड मॉर्निंग' हा मेसेज सेंड करत होता.. पहिला दिवस सोडला तर तिने नंतर त्याच्या मेसेजला रिप्लाय ही केला नव्हता.. म्हणून त्याने आज तिला फोन करायचं ठरवले..

पण फोन करून बोलणार तरी काय?

त्याच्याकडे ठोस असे कारण ही नव्हते.. तो विचार करू लागला..

समीर आणि आर्या खूपच आनंदित होते.. आज त्यांनी घेतलेल्या मेहनतीचं चीज होणार होते.. ठरल्याप्रमाणे प्रेझेन्टेशन खूपच छान पार पडले.. क्लायंटला ही हे काम खूपच आवडलं.. त्यामुळे शेखर सुद्धा ह्या दोघांवर खूपच खुश होता.  तसेच सगळया स्टाफने ही दोघांचे फारच कौतुक केले.

आर्याला खूपच भरून आले.  कारण हे तिचे स्वतःच असं पाहिलं प्रोजेक्ट होतं.. समीर जरी मदतीला असला तरी सगळयात जास्त मेहनत ही आर्याची होती..

इतक्यात शेखरने समीरला इशारा केला आणि समीरने ही तो ओळखला.. तो आता आर्याला काही बोलणारच होता की.........

अचानक आर्याचा फोन वाजला.

आर्याने फोनच्या स्क्रीनवर बघितले तर तो फोन अनिशचा होता...

# गुंतता हृदय हे!! (भाग ५)

आर्या मनातच म्हणाली, "अनिशचा फोन??"

क्षणभरासाठी तिने समीरच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले आणि समीरला म्हणाली, "मी आलेच २ मिनिटात"

व तिने अनिशचा कॉल रिसिव्ह केला..

तिने फोन उचलताच अनिशने आर्यावर नुसता प्रश्नांचा भडिमार सुरू केला.

तो म्हणाला,"आर्या तू ठीक तर आहेस ना? की, तुला माझा कोणत्या गोष्टीबद्दल राग आला आहे? तू फक्त पहिल्या दिवशीच मेसेजचा रिप्लाय दिलास, बाकी दिवशी तू माझा मेसेज ओपन करूनही नाही बघितलास.. काय झालाय तुला? तू अशी का वागते आहेस माझ्याशी??"

बापरे, आर्याच्या लक्षात ही आले नव्हते की, तिच्या मेसेज न करण्यामुळे असे काही तरी होईल.. पण तिला हे ही जाणून घ्यायचे होते की, अनिशची ही फक्त काळजी आहे की, त्याच्या मनात दुसरंच काहीतरी चाललय.. असे असंख्य विचार तिच्या मनात चालूच होते.

तेवढ्यात अनिश समोरून म्हणाला,"आर्या are you there???"

आर्या पटकन भानावर आली आणि म्हणाली, "हो, अरे, किती काळजी करशील.  मी एकदम ठणठणीत आहे.  इतके दिवस मी ऑफिसच्या कामात खूपच व्यस्त होते.  म्हणून खूप दिवस व्हाट्सएप ओपन करून नाही पाहिले आणि मी तुझ्यावर का रागविन.  तुझं आपलं काहीतरीच असतं. "

तिचे बोलणं मधेच तोडत पटकन अनिश म्हणाला,"माझ्याबरोबर आज कॉफी प्यायला येशील? प्लीज"

आर्याला काय बोलावे हे सुचतच नव्हते..

चक्क अनिश तिला भेटायला बोलवत होता..

ती मंद हसली आणि म्हणाली, "हो नक्कीच.. का नाही"

अनिश हे ऐकून खूपच खुश झाला.. तो म्हणाला, "मस्त.. मी तुला जागा आणि वेळ मेसेज करतो.. मग आपण भेटू.. अरे हो, अजून एक.. कृपा करून आज तरी निदान माझा मेसेज वेळेवर वाच म्हणजे झालं"

दोघेही हसले.. आणि मग दोघांनीही फोन ठेऊन दिला..

आर्या हसत हसतच समीर जवळ आली..

इतक्यात तिला आठवले की, समीरला तिला काहीतरी सांगायचे होते..

ती लगेच म्हणाली, "अरे समीर तू काहीतरी सांगणार होतास.  बोल काय बोलायचंय. "

तो बोलणारच होता की, आर्याच्या फोनची मेसेज टोन वाजली.. तिने पाहिले तर अनिशचा मेसेज होता.  त्याने तिला भेटायची वेळ आणि ठिकाणाचे नाव मेसेज केले होते..

त्याने भेटायची वेळ ५ वाजताची दिली होती.

आर्याने घड्याळाकडे बघितले तर ३ वाजत होते.. म्हणजे आर्याकडे फक्त २ तासच होते.. तयार व्हायला.. ती लगेच शेखरजवळ गेली व तिने शेखरला request केली की, तिला एका

महत्वाच्या कामामुळे आताच घरी जावे लागणार म्हणून.. शेखरने एकवार समीरकडे पाहिले.. तर समीरने 'हां' असा इशारा केला.. मग काय, शेखरने आर्याला हो म्हंटले.

मग आर्याने पर्स उचलली आणि ती घरी जायला निघणार.. इतक्यात तिला काहीतरी आठवले म्हणून ती परत आली आणि समीरच्या समोर उभी राहिली व म्हणाली, "सो, सॉरी यार, आपण उद्या बोललं तर चालेल तुला, प्लीज, मला खूप अर्जेन्ट काम आहे. उद्या नक्की बोलू.. बाय!!"

समीरने आर्याकडे बघून स्मित हास्य केले आणि मानेने हो म्हटले..

आर्या थोड्याच वेळात घरी पोहोचली.. आर्याला लवकर घरी आलेलं पाहून तिची आई सुद्धा थोडी आश्चर्यचकित झाली.. कारण महत्वाचं कारण असल्याशिवाय आर्या कधीच लवकर घरी येत नसे आणि सुट्टी ही घेत नसे.. ती तिचे काम चोख करत असे.. नेहमीच!!

जोशी काकू म्हणजेच आर्याची आई आर्याला म्हणाल्या, "अग आर्या, आज लवकर कशी आलीस? कुठे बाहेर जायचंय काय?"

आर्या उत्तरली,"हो आई. मला थोडं ऑफिसच्या कामासाठी बाहेर जायचंय.. मी येईन तासाभरात परत.. "

(थोड्यावेळानंतर.. )

"अगं अगं, काय हवय तुला मला सांग. मी देते काढून. ही मुलगी ना.. सगळ्या कपड्यांच्या घड्या विस्कटून टाकल्या. आर्या हे सगळे कोण उचलणार.. किती तो पसारा केलायेस.. " काकू म्हणाल्या.

"आई बस ना आता, निदान आज तरी नको ना.. मी आवरेन आल्यावर रूम.. आता प्लीज तू शांत राहा.. कटकट नको करुस" आर्या म्हणाली आणि घरातून लवकर सटकली..

जोशी काकूंची बडबड सुरूच होती..

जशा सगळयांच्याच आई करतात😁

असो, आर्या ५ मिनीट आधीच कॉफी शॉपमध्ये पोहोचली.. पण पाहते तर काय???

अनिश आधीच तिथे बसलेला तिला दिसला..

अनिशने ही आर्याला पाहिले आणि बघतच राहिला.. आर्याच्या बाबतीतही तसचं काहीतरी झालं..

अनिशने ब्लॅक टी-शर्ट आणि ब्लू जीन्स घातली होती व डोळयांवर ग्लेअर लावला होता.. आणि आर्याने पिंकीश कलरचा चुडीदार, एका हातात बंगल्स आणि दुसऱ्या हातात घड्याळ घातले होते.. केस मोकळे सोडले होते आणि कानात झुमके आणि कपाळावर डायमंड टिकली लावली होती व ओठांवर मॅचिंग लिपस्टिक..

वाह!! ती इतकी सुंदर दिसत होती की, बघणारे बघतच राहतील.. मग अनिशच काय झालं असेल.. तुम्ही विचारच करा..

दोघांनीही एकमेकांना ग्रीट केले आणि दोघे बसले... दोघेही एकमेकांकडे नजर चोरून बघत होते.. बोलायला कशी आणि काय सुरुवात करावी असे दोघांच्याही मनाला वाटत असावे.

मग काय अनिशनेच पुढाकार घेतला आणि २ कॉफी ऑर्डर केल्या..

आज त्याची नजर आर्यावरून हटतच नव्हती..

त्याला असं वाटतं होते, आज वेळ इथेच थांबावी आणि त्याने आर्याला असच बघत राहावे.

इतक्यात आर्या बोलली, "अनिश तुला काही बोलायचे होते का?"

"अ.. म्.. हो.. म्हणजे तू ठीक आहेस की नाही हे.. म्हणजे नाही.. " अनिश बोलता बोलता थांबला..

त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि बोलणार तर वेटर कॉफी घेऊन आला..

आर्या अनिश काय बोलतोय याची वाट पाहत होती..

वेटर निघून गेल्यावर अनिश उठून आर्या जवळ आला आणि तिच्या समोर गुडघ्यांवर बसून त्याने चक्क तिला लग्नाची मागणी घातली..

आर्याला हे सगळं स्वप्नचं वाटत होतं.. तिला काय बोलावं हे सुचत नव्हतं.. अनिशला ही आर्याच्या मनाची अवस्था समजत होती.  कारण त्याला ही वाटले नव्हते की, तो आज आर्याला मागणी घालेल ती पण लग्नाची.. तो उठला त्याने खुर्ची सरकवली आणि आर्याचा हात हातात घेतला..

आर्या काही बोलणारच होती.  पण त्याआधी अनिश म्हणाला, "आर्या ह्या माझ्या मनातल्या भावना आहेत.. तुझा जो काही निर्णय असेल मला तो मान्य असेल.. मला नाही माहीत हे कसे झाले पण झाले.. तुला माझा राग आला असेल तर मला माफ कर पण... "

आर्याने अनिशच्या तोंडावर हाथ ठेवला आणि म्हणाली, "बस, आता काही नको बोलूस.. मला सुद्धा हेच ऐकायचे होते.. मला ही तू खूप आवडतोस अनिश.. अगदी पहिल्या दिवसापासून.. जेव्हा मी तुला पहिल्यांदा पाहिले होते.. I love you अनिश"

बाहेर खूप पाऊस पडत होता आणि कॉफी शॉप मध्ये गाणं सुरू होतं..

🎶🎶मी तुला तू मला गुणगुणू लागलो, पांघरू लागलो सावरू लागलो🎶🎶🎶

नाही कळले कधी, जीव वेडावला🎶🎶

ओळखू लागलो तू मला मी तुला

नाही कळले कधी,  धुंद हूरहुर ही श्वास गंधावला

ओळखू लागलो तू मला मी तुला

नाही कळले कधी.....

मी तुला तू मला गुणगुणू लागलो, पांघरू लागलो सावरू लागलो

नाही कळले कधी, नाही कळले कधी

# गुंतता हृदय हे !! (भाग ६)

आज आर्या गुणगुणतच घरी आली....

ती खूपच खुश होती..

तिच्या चेहऱ्यावर वेगळीच चमक आली होती..

आज रात्री जेवताना ही आर्याच लक्ष कुठेतरी दुसरीकडेच होतं..

तिने भराभर जेवण आटपलं आणि तिच्या खोलीत झोपायला गेली..

तिने लागलीच फोन चेक केला तर अनिशचा मेसेज होता.. "जेवलीस का?"

आर्याने सुद्धा रिप्लाय दिला आणि मग रात्रभर दोघेही मेसेजने बोलत होते..

अनिशने फोन ही केला होता पण आर्याला सध्या तरी घरी कळू द्यायचे नव्हते. म्हणून तिने घरी नीट सांगेपर्यंत रात्री फक्त मेसेजने बोलायचे असे ठरविले. अनिशने ही आर्याला समजून घेतले..

(दुसऱ्या दिवशी सकाळी)

"गुड मॉर्निंग मुंबई!!"

मी आहे तुमचा सर्वांचा आवडता RJ अमेय.

तुमच्च्या सर्वांचे स्वागत आहे "गुंतता हृदय हे!!" च्या आजच्या ब्रँड न्यू एपिसोड मध्ये.

हुश्श!! तुमचं किती प्रेम आहे हो माझ्यावर.. मला भेटण्यासाठी तुम्ही इतक्या कथा पाठवल्यात..

Woww.. amazing!! मी खूप खूप आभारी आहे तुमचा..

असो, ह्या प्रतियोगीतेचे विजेते कोण आहेत.. हे मी तूम्हाला लवकरच सांगेन.. आणि त्या भाग्यवान विजेत्यांना मिळणार आहे मला भेटण्याची संधी..

(टाळयांच्या कडकडाटाचा आवाज येतो)

सो guys, प्रेम हे सगळेच करतात, पण जे अनुभवतात त्यांची बातच और आहे.. तो स्पर्श, तो सहवास आपल्याला हवाहवासा वाटतो.. प्रत्येक लहानसहान गोष्टींवरून त्याची/तिची आठवण होते आणि नकळत ओठांवर हे शब्द येतात..

🎶🎶जीव दंगला, गुंगला, रंगला असा,

पिरमाची आस तू🎶🎶जीव लागला,

लाभला ध्यास ह्यो तुझा, गहिवरला श्वास तू🎶🎶

पैलतीरा नेशील, साथ मला देशील,

काळीज माझं तू🎶🎶सुख भरतीला आलं, नभं धरतीला आलं, पुनवंचा चांद तू🎶🎶

जीव दंगला, गुंगला, रंगला असा, पिरमाची आस तू

जीव लागला, लाभला ध्यास ह्यो तुझा, गहिवरला श्वास तू

🎶🎶चांद सुगंधा येईल, रात उसासा देईल

सारी धरती तुझी, रुजव्याची माती तू

खुळं आभाळ ढगाळ, त्याला रुढींचा इटाळ

माझ्या लाख सजणा ही कांकणाची तोड माळ तू

खुळं काळीज हे माझं तुला दिलं मी आंदण

तुझ्या पायावर माखेल माझ्या जन्माचं गोंदण🎶🎶

जीव दंगला, गुंगला, रंगला असा, पिरमाची आस तू

जीव लागला, लाभला ध्यास ह्यो तुझा, गहिवरला श्वास तू🎶🎶

आर्या बेडवर लोळतच रेडिओ ऐकत असते..

"किती छान गाणं होतं.. मिस यु अनिश💞" आर्या म्हणते.

इतक्यात मेसेजची बीप वाजते..

"गुड मॉर्निंग my love"

आर्याची सगळ्यात रोमँटिक सकाळ होती ही..

तिने ही रिप्लाय केला व काही वेळ अनिशसोबत chat केला.

इतके रोमँटिक गाणं ऐकल्यावर तुम्हीच विचार करा ना काय चाट केला असेल तो😁

इतक्यात तिचं घड्याळाकडे लक्ष गेले मग तिने शेवटचा मेसेज सेंड केला की, ऑफिसला निघाल्यावर तुला कॉल करते म्हणून आणि ती ऑफिसला जायच्या तयारीला लागली..

स्निग्धाचा आजही काहीच पत्ता नव्हता.. ती फोन सुद्धा उचलत नव्हती.. म्हणजे आजपण ऑफिसला येण्याचे चान्सेस कमीच होते..

आर्याने अनिशला फोन केला आणि बोलतबोलत ती कधी ऑफिसला पोहोचली तिला तिचे कळलेच नाही..

ती तिच्या डेस्कजवळ गेली आणि तिने तिथे पर्स ठेवली. तेवढ्यात तिचं लक्ष समीरच्या डेस्क कडे गेलं.. पण तिथे कुणीच नव्हतं.. म्हणजे समीर अजून ऑफिसला आला नव्हता.. कॉफी पिण्यासाठी आर्या कॅन्टीनमध्ये जाणार इतक्यात समीर आला..

अचानक आलेल्या पावसाच्या सरीमुळे त्याचे केस थोडेफार भिजले होते.. तो आज रोजच्यापेक्षा खूपच handsome दिसत होता.. आर्या ही एक क्षण त्याच्याकडे बघतच राहिली..

अचानक समीरने "गुड मॉर्निंग आर्या" अशी हाक मारल्यावर ती भानावर आली..

तिला काय बोलावे हेच सुचत नव्हते..

तिने फक्त हाताने कॅन्टीनकडे खूण केली..

समीर पण त्याची बॅग ठेवून कॅन्टीनमध्ये आला..

दोघांनीही कॉफी घेतली.

तेवढ्यात आर्या पटकन म्हणाली, "समीर, तुला काल मला काहीतरी सांगायचं होतं ना?, सॉरी मी इतकी घाईत होते की, anyway आता बोल ना काय सांगायचे होते ते".

त्यावर समीर म्हणाला, "काही खास नाही गं. पण वेळ आल्यावर तुला नक्की सांगेन"

दोघांनी आपापली कॉफी संपवली आणि आपापल्या कामाला लागले..

आज काम भरपूर असल्यामुळे लंचला ही फुरसत नव्हती..

त्यामुळे दोघांचा लंच ही त्यांच्या सोयीनुसार कामातून वेळ मिळेल तसा झाला..

कामाच्या व्यापात ऑफिस सुटायची वेळ कधी झाली हे ही दोघांना कळले नाही..

आज बाहेर भरपूरच पाऊस पडत होता..

त्यामुळे आर्याला स्टेशनपर्यंत जायला ऑटोरिक्षाही मिळत नव्हती.

तिने १-२ रिक्षा थांबवण्याचा प्रयत्न केला, पण कोणीच थांबायला तयार नव्हते..

समीर लांबूनच आर्याची धडपड बघत होता. न राहवून मग त्याने सरळ त्याची बाईक आर्याच्या समोर उभी केली आणि अगदी हक्काने बोलतात तसा बोलला, "बस बाईकवर. मी सोडतो तुला स्टेशनपर्यंत. "

आर्या ही कोणतेही आढेवेढे न घेता त्याच्या बाईकवर बसली. समीरने आर्याला स्वतःचे जॅकेट ही घालायला दिले.

"Be comfortable. मी सांभाळून नेईन तुला", समीर म्हणाला आणि बाईक चालू केली.

समीर आज खूपच खुश होता कारणही तसचं होतं ना!! अहो, आर्या जी बसली होती बाईकवर!!😍

त्याला मनात असे वाटत होतं की, हा रस्ता कधीच संपू नये..

तो मनातल्या मनात गाणं गुणगुणत होता...

🎶🎶गारवा

🎶🎶गारवा

वाऱ्यावर भिर-भिर-भिर पारवा, नवा नवा

प्रिये, नभात ही

चांदवा नवा नवा

गारवा🎶🎶

🎶🎶गवतात गाणे झुलते कधीचे

गवतात गाणे झुलते कधीचे

हिरवे किनारे हिरव्या नदीचे

हिरवे किनारे हिरव्या नदीचे🎶🎶

🎶🎶पाण्यावर सर-सर-सर काजवा, नवा नवा

प्रिये, मनात ही ताजवा नवा नवा

गारवा🎶🎶

🎶🎶आकाश सारे माळून तारे

आता रुपेरी झालेत वारे

आकाश सारे माळून तारे

आता रुपेरी झालेत वारे🎶🎶

अंगभर थर-थर-थर नाचवा, नवा नवा

प्रिये, तुझा जसा गोडवा नवा नवा

गारवा🎶🎶

मधेमधे आरशातून आर्याला चोरून बघत होता..

आर्याला समीरला पकडून बसायला थोडं uncomfort वाटत होतं..

पण रस्त्यात इतके खड्डे होते की, समीरला धरून बसण्याशिवाय आर्याकडे पर्यायच नव्हता..

Just imagine करा काय क्षण असेल तो!!

एव्हाना पावसाचा जोरही थोडाफार कमी झाला होता.. आणि स्टेशनही आलं..

समीरने नाइलाजाने बाईक थांबवली.. त्याचं मन करत होतं की, दिवसभर आर्या सोबत राहाव.. पण त्याने मनाला आवरलं..

आर्या खाली उतरली आणि समीरला म्हणाली, "Thank you so much समीर, चल बाय, उद्या भेटू"

ती पुढे निघालीच होती की, तिच्या लक्षात आले.

समीरचं जॅकेट तिच्याकडेच होतं..

म्हणून ते परत द्यायला ती वळली..

तर समीर तिथेच उभा होता..

तिने जॅकेट काढून समीरला दिले आणि निघणार

तेवढ्यात..

समीरने आर्याला हाक मारली आणि तिला बोलू लागला, "आर्या मला तुला काहीतरी सांगायचं आहे"

ती थांबली आणि म्हणाली "हा बोल ना काय बोलायचंय. "

समीर म्हणाला, "actually आर्या, मी कसं सांगू हेच कळत नाहीये.. hope तू मला समजून घेशील.. आर्या प्लीज तू माझ्यावर रागवू नकोस?"

"किती कोड्यात बोलतोयस.. आता जर तू नाही बोललास तर मात्र मी नक्की रागविन.. बोल पटकन.. " आर्या म्हणाली.

समीरने आर्याचा हात हातात घेतला आणि तो म्हणाला, "आर्या I love you.. माझं तुझ्यावर खूप खूप प्रेम आहे.. अगदी पहिल्या दिवसापासून.. जेव्हा मी तुला पाहिल्यांदा ऑफिसमध्ये बघितलं होतं.. तुझं माझ्याबरोबर नेहमी भांडणं आणि माझा राग राग करणं.. सगळया ऑफिसच्या मुली माझ्या पाठी असताना सुद्धा तुला माझ्यात इंटेरेस्टच नसणे.. आणि मग प्रोजेक्टच्या निमित्ताने आपण एकत्र घालवलेला वेळ.. काय आणि किती सांगू.. "

आर्या त्याच्याकडे बघतच राहिली..

तिला स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं की, समीर कधी तिच्यावर प्रेम करेल.. कारण नेहमी त्याच्या आजूबाजूला मुलींचा घोळका असे.. त्यामुळे त्याच्याशी कधीच कामाव्यतिरिक्त बोलण्याचा प्रश्नच नव्हता..

प्रोजेक्ट पासूनच तो आर्याबरोबर ऑफीसमध्ये जास्त वेळ घालवू लागला होता.. तेव्हाच या दोघांची घट्ट मैत्री झाली होती आणि त्या मैत्रिमुळेच आज आर्या निःसंकोचपणे त्याच्या बाईकवर बसली होती..

पण तो असा काहीतरी विचार करेल हे तिला खरचं वाटलं नव्हतं...

ती मनात म्हणाली की, "समीरला अनिश बद्दल सगळे सांगायला हवे.. नाहीतर तो जास्तच सिरीयस होईल"..

आर्याने पहिला स्वतःचा हात त्याच्या हातापासून लांब केला व ती बोलू लागली, "समीर प्लीज मला चुकीचं समजू नकोस.. तू खरचं खूप चांगला मुलगा आहेस.. प्रत्येक मुलीला तुझ्यासारख्याच लाइफपार्टनरची अपेक्षा असेल.. पण माझं दुसऱ्याचं व्यक्तीवर प्रेम आहे आणि

त्याचं ही माझ्यावर.. मी तुझ्या भावना समजू शकते पण स्वीकारू शकत नाही.. प्लीज मला माफ कर समीर.. पण आपली मैत्री आहे तशीच राहील नेहमी.. प्लीज मला समजून घे"

असे बोलून ती निघून गेली..

आर्याच्या लाइफमध्ये दुसरे कोणीतरी आहे हे समीर सहनच करू शकत नव्हता पण त्याला हे ही माहीत होतं की, प्रेमात नेहमी दिलं जातं.. प्रेम कधीच जबरदस्तीने नाही केलं जात..

तो आर्या नजरेआड होईपर्यंत तिला बघत होता..

पाऊसाचा जोर पुन्हा वाढला होता..

समीर त्याच जागेवर उभा होता.

त्याचे डोळयातल पाणी... पावसाच्या पाण्यात कधी मिसळल हे त्याच त्यालाच कळल नाही..

त्याने इतके प्रेम कधीच कुणावर केले नव्हते..

जितके आर्यावर केले होते..

आज आभाळही फाटलं होतं..

सरीवर सरी बरसत होत्या आणि त्या त्याच्या डोळयातील अश्रूंना स्वतःमध्ये सामावून घेत होत्या..

आणि अचानक कुठेतरी हे शब्द ऐकू येत होते..

🎶🎶पेटलं आभाळ सार पेटला हा प्राण रे

उठला हा जाळ आतून करपल रान रे

उजळतांना जळून गेलो राहील ना भान

डोळयातल्या पाण्याने हि भिजेना तहान.  तहान... 🎶🎶

🎶🎶दूर दूर चालली आज माझी सावली

दूर दूर चालली आज माझी सावली

कशी सांज हि उरी गोठली

उरलो हरलो दुखः झाले सोबती

उरलो हरलो दुखः झाले सोबती🎶🎶

# गुंतता हृदय हे!! (भाग ७)

आर्याला समीरसाठी खूपच वाईट वाटत होते.. पण ती काहीही करु शकत नव्हती..

इतक्यात तिचा फोन वाजला..

पण पर्स मधून बाहेर काढेपर्यंत तो कट झाला..

तिने फोनच्या स्क्रीनवर चेक केले तर अनिश चे ८ मिस् कॉल्स होते..

तिने लगेच अनिशला फोन केला..

अनिश ने फोन उचलला आणि तो ती काही बोलायच्या आत तिला म्हणाला, "आर्या अग कुठे आहेस तू? तू ठीक आहेस ना? मी किती कॉल केले तुला? एकतर पाऊस पण भरपूर आहे.. त्यामध्ये तू फोन पण उचलत नव्हतीस.. Thank God तू फोन उचललास.. बरं ते सर्व जाऊ देत, तू सरळ घरी जा आता.. आपण उद्या भेटू.. "

आर्या त्याचे बोलणे मधेच तोडत म्हणाली, "अरे हो.. हो.. श्वास तरी घे बोलताना.. मी एकदम ठीक आहे.. माझ्या ऑफिसमधल्या एका फ्रेंडने मला स्टेशनला ड्रॉप केले.. मी पोहोचेनच घरी.. तू कुठे आहेस?"

"मी घरीच आहे, माझे टेन्शन सोड.. तू पहिले घरी पोहचल्यावर मला फोन कर ओके.. चल बाय.. लव्ह यु" समीर म्हणाला..

"लव्ह यु टू" आर्या उत्तरली..

काही वेळातच आर्या घरी पोहोचली..

नेहमीप्रमाणे तिने घराची डोअरबेल वाजवली.. आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला कारण दरवाजा चक्क अनिशने उघडला होता..

त्याला पाहून ती खूपच खुश झाली..

आत जाऊन बघते तर अनिशचे आई बाबा सुद्धा आले होते व ते आर्याच्या आई बाबांबरोबर गप्पा मारत चहा पित होते.. आर्याच्या आईने भजी पण केली होती.. त्याचाही सगळे आस्वाद घेत होते..

आर्याला काहीच कळत नव्हते.. नक्की काय चाललंय ते..

आर्याने खुणेने अनिशला विचारले पण तो काहीच बोलला नाही.. तेवढयात सगळ्यांची नजर आर्यावर गेली..

आर्या बऱ्यापैकी भिजली होती..

ती सगळ्यांना बघून म्हणाली, "मी पटकन फ्रेश होऊन येते"

थोड्याचवेळात आर्या फ्रेश होऊन आली.

तेव्हा अनिशच्या आईने म्हणजेच गोडबोले काकूंनी तिला जवळ बोलाविले.. आणि म्हणाल्या, "आर्या, बेटा मला पहिल्यांदा जेव्हा तू आमच्या घरी आलेलीस ना तेव्हाच आवडलेलीस माझ्या अनिशसाठी.. पण मी हे कोणालाच सांगितले नव्हते.. तुम्ही आजकालची मुलं आपापल्या पसंतीने लग्न करणारी.. मला उगाच माझी आवड अनिशवर लादायची नव्हती.. पण देवाने माझं ऐकले आणि आजच अनिशने तुमच्या दोघांबद्दल मला सांगितलं.. मला माफ कर बेटा, मला अनिश बोललेला तू अजून घरी काहीच सांगितले नाही पण मला बाई राहावेच ना.. म्हणून आजच आली तुला माझ्या अनिशसाठी मागणी घालायला.. "

तेवढ्यात आर्याची आई पटकन म्हणाली, "आम्हाला पण तुमचे अचानक येणे थोड चमत्कारिकच वाटलं.. पण कारण ऐकल्यावर आनंदच झाला.. आम्हाला शोधूनही अनिशसारखा मुलगा आमच्या आर्यासाठी सापडला नसता. "

आर्याने एकवार अनिशकडे बघितले आणि मंद हसली..

तेवढ्यात अनिशची आई म्हणाली, "अनिशच्या बाबांनी आणि मी असे ठरवले आहे की, लवकरात लवकर आपण या दोघांचा साखरपुडा उरकून घेऊयात.. मला तर वाटतं पुढच्या आठवड्यातच करूयात.. तुमचे काय म्हणणं आहे याबद्दल आर्याचे आई-बाबा"

आर्याच्या आई-बाबांना साखरपुडा खूपच लवकर वाटत होता, कारण एका आठवड्यात हॉल बघणे, आमंत्रणे पाठवणे कठीणच वाटत होतं..

पण आर्या आणि अनिशने या सगळयाची जवाबदारी स्वतःवर घेतली आणि अनिशच्या ओळखीने सर्व व्यवस्था वेळेवर होईल असे अनिश म्हणाला.  पण आर्या आणि अनिशची एकच अट होती की, लग्न त्यांना इतक्या लवकर करायचे नव्हते.. अटलिस्ट त्यांना ६ महिन्याचा अवधी हवा होता..

यासाठी आर्या आणि अनिश या दोघांनाच्याही घरच्यांनी त्यांना संमती दिली..

मग काय घरातले वातावरण एकदम आनंदी झाले..

आर्या तर मनातल्या मनात अनिशकडे बघून हे शब्द गुणगुणत होती..

🎶🎶ब्यांड बाजा, वरात घोडा

घेउनि या नवरोजी

लगीन घटिका समीप आली

करा हो लगीन घाई🎶🎶

समीर खूप उशिराने घरी पोहोचला आणि काही न खाता त्याच्या खोलीत झोपी गेला.. झोपला कसला जागाच होता पण आपले घरच्यांना दाखवण्यासाठी झोपण्याचं नाटक केलं होतं..

रात्रभर तो आर्याच्या आठवणीत रडत होता..

त्याला माहीत होतं की, ह्यात त्याची काहीच चूक नाही..

कारण जर आर्या त्याच्यावर प्रेमच करत नसेल तर तो तरी काय करेल..

त्याने मनाशीच विचार केला,"आता आर्याच्या समोर जाण्यात काहीच अर्थ नाही.. मी जितका तिच्यापासून लांब राहीन तितकच खुश राहीन".

म्हणून त्याने ही नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि Resignation लेटर टाईप करुन त्याची printout काढली आणि ती envelope मध्ये भरून ठेवली व तो सकाळ होण्याची वाट पाहू लागला..

आर्याची रात्र खूपच मस्त होती आणि आता तर नातं सुद्धा officially झाल्यामुळे रात्रीचे फोन पण सुरू झाले होते..

आर्या आणि अनिशला विश्वासच होत नव्हता की, काही दिवसात त्यांचा साखरपुडा आहे म्हणून..

(दुसऱ्या दिवशी सकाळी)

"गुड मॉर्निंग, मुंबई"

मी तुमचा सर्वांचा आवडता RJ अमेय.

तुमच्या सर्वांचे स्वागत आहे "गुंतता हृदय हे" च्या ब्रँड न्यू एपिसोड मध्ये..

सो फ्रेंड्स, मंगेश पाडगांवकरांनी म्हटलेच आहे की,

"प्रेम म्हणजे प्रेम असतं,

तुमचं आणी आमचं अगदी 'सेम' असतं !"

मित्रांनो हे खरच आहे, काहींना ते मिळत तर काहींना नाही मिळत पण तरीही कुणी कधी प्रेम करन सोडत का?

पण हे पण तितकच खरं आहे की, आपण ज्याच्यावर मनापासून प्रेम करतो त्या व्यक्तीची जर आपल्याला आयुष्यभर साथ मिळाली तर........... (थोडावेळ थांबून)

तर आयुष्य किती happening होईल.. फुल्ल ऑन रोमँटिक.. आणि मग हे गाणं नक्कीच गुणगुणावसं वाटेल...

🎶🎶दृष्ट लागण्याजोगे सारे,

गालबोटही कुठे नसे

जग दोघांचे असे रचू की

स्वर्ग त्यापुढे फिका पडे!🎶

"How romantic!! काय आवाज आहे यार ह्या RJ अमेयचा, कसा असेल ना तो दिसायला? अनिशला माहीत असेल, पण जाऊ देत उगाच त्याला गैरसमज झाला तर मी का इतकी चौकशी करतेय अमेयची म्हणून.. नको रे बाबा मला कसली रिस्क नाही घ्यायची", आर्या म्हणाली.

इतक्यात तिचा फोन वाजला..

अर्थात, तो अनिशचा होता.. आर्याने फोन उचला आणि ती अनिश बरोबर बोलू लागली.. आर्या अनिशबरोबर बोलत असताना तिला तिच्या फोनवर दुसरा कॉल येत होता.. तिने चेक केले तर तो स्निग्धाचा होता..

मग काय, आर्याने अनिशला ऑफिसला निघताना कॉल करते म्हणून फोन ठेवला आणि स्निग्धाचा फोन उचलला..

"अगं, नालायक, कारटे कुठे होतीस इतके दिवस? किती मिस केले मी तुला? आज आठवण आली तुला माझी? बरं ते जाऊ देत येतेएस ना आज ऑफिसला?" आर्या म्हणाली.

"नाही ग.  उद्यापासून जॉईन होईन ऑफिसला.. पण आज येणार आहे.. माझे मेडिकल document, HR ला द्यायला.  लंच टाइमला येईन मग आपल्याला थोड्या गप्पा तरी मारता येतील" स्निग्धा उत्तरली.

"फाईन.. तुला खूप काही सांगायचं आहे आणि एक surprize सुद्धा आहे तुला", आर्या म्हणाली.

"ए, त्या समीरला कोणी पटवल तर नाही ना? मी नव्हती इतके दिवस म्हणून बोलतेय? फोडून काढेन त्या सटवीला"

स्निग्धा म्हणाली..

आर्या थोडं थांबून मग म्हणाली, "अग बाई तू आधी ये तरी मग सांगते तुला"

काहीवेळानंतर आर्या ऑफिसला पोहोचली.. तिचं लक्ष रोजच्याप्रमाणे समीरच्या डेस्क वर गेलं.. पण समीर अजून आला नव्हता.. आर्याने थोडावेळ वाट पाहिली.. तिला समीर बरोबर कॉफी प्यायची सवय जी लागली होती.. अर्धा तास झाला तरी समीरचा पत्ताच नव्हता.. मग आर्याने कॉफीचा विचार सोडूनच दिला.. ती तिच्या कामाला लागली..

पण राहून राहून सारखं मनात वाटत होतं की, "समीर ठीक तर असेल ना? कालच्या प्रसंगामुळे कदाचित त्याला खूप जास्त hurt झालं असेल.. पण मी काय करणार होती, माझं प्रेम तर अनिशवर आहे.. hope समीर ह्यातून लवकरात लवकर बाहेर पडेल.. पण ह्या सगळ्यामध्ये मी माझा एक चांगला मित्र गमावला"

आर्याचे डोळे भरून आले..

शेखरला सकाळीच समीरचा मेसेज आला की, तो ही नोकरी सोडतोय आणि त्याबद्दलचा ई-मेल त्याने HR टीम आणि शेखर दोघांनाही सेंड केला आहे.. तसेच संध्याकाळपर्यंत त्याचे Resignation Letter सुद्धा ऑफिसमध्ये कुरिअरने पोहोचेल..

शेखरने मेसेज वाचताच समीरला कॉल केला पण समीरचा नंबर स्विच ऑफ येत होता....

त्याने ई-मेल चेक केला तर फॉर पर्सनल रीजन असे कारण लिहिले होते.. समीर अस काही न सांगता एकाएकी नोकरी सोडेल असं शेखरला वाटल नव्हतं..

बरं हा पठ्या फोन पण बंद करून बसला होता..

मग काय, शेखरने समीरचे resignation, HR टीम ला सांगून होल्ड वर ठेवायला सांगितले..

कदाचित काही दिवसात त्याचा विचार बदलेल असे शेखरला वाटत होते..

तसेच त्याने HR टीमला ही बातमी कोणाला कळता कामा नये ही तंबी ही दिली..

शेखर विचार करू लागला की, समीरने इतक्या तडकाफडकी नोकरी सोडायचा निर्णय का घेतला असावा.. काय कारण असेल? आर्या तर नाही ना??????

# गुंतता हृदय हे!! (अंतिम भाग)

शेखरने आर्याला त्याच्या केबिनमध्ये बोलविले आणि तिला समीरबद्दल विचारले.

पण आर्याने तिला ह्याबद्दल काहीच माहीत नाही हे सांगितले.. शेखरला आर्याच्या एकंदरीत वागण्यावरून थोडा संशय आला होता की, नक्कीच या दोघांमध्ये काहीतरी बिनसलयं म्हणूनचं समीरने नोकरी सोडण्याचा तडकाफडकी निर्णय घेतला असेल..

तरी शेखरने आर्याला समीरच्या नोकरी सोडण्याबाबत काहीच कळू दिले नाही.. कारण इतक्यात त्याला हे ऑफिसमध्ये कोणालाही कळू द्यायचे नव्हते..

आर्या तिच्या डेस्कजवळ आली आणि विचार करू लागली, "हा समीर नक्की कुठे गेलाय? आणि हा शेखर त्याच्याबद्दल मला का विचारत होता? समीरने शेखरला त्याला माझ्याबद्दल वाटणाऱ्या भावना सांगितल्या असतील का? शीट यार.  हा समीर पण ना.. देव करो तो ठीक असू देत"

आर्या हे स्वतःशीच बोलत कामाला लागली.. लंच टाइम होतच आला होता की, तिथे स्निग्धा आली..

आणि म्हणाली, "काय मॅडम,कशा आहात?"

स्निग्धाला इतक्या दिवसांनी बघून आर्याच्या आनंदाला पारावरच उरला नाही.. तिने स्निग्धाला गच्च मिठी मारली..

मग दोघीही लंचसाठी कॅन्टीनमध्ये गेल्या..

"बोल कशी आहेस? अरे हो, तू कसले तरी सरप्राईज देणार होतीस.. कसलं सरप्राईज?? मला आताच हवंय.. दे बघू पहिलं" स्निग्धा म्हणाली.

"अग हो, सांगते.. सगळं सांगते.. तर सरप्राईज हे आहे की, माझं लग्न जमलंय" आर्या म्हणाली.

"काय सांगतेयेस!!" स्निग्धा जोरात ओरडली..

आर्याने तिला हळू बोल असं सागितलं... मग स्निग्धा शांतपणे म्हणाली, "काय सांगतेयेस!! कोण हा मुलगा? तो रेडीओ वाला अमेय तर नाही ना? की, दुसरा कोणतरी पटवलास? बोल ना यार? आता सस्पेन्स वगैरे नको ठेवू.. बोल पटकन"

"त्याचं नाव अनिश आहे आणि गम्मत म्हणजे तो रेडिओ चॅनल वर काम करतो.. " आर्या म्हणाली.

"अग, मग त्याला विचारलस का, त्या RJ अमेयबद्दल? त्याला माहीतच असेल ना तो कसा दिसतो.. वगैरे.. "

स्निग्धा म्हणाली.

"तसा मनात खूप वेळा विचार तर आलेला. पण म्हटलं, अनिशला नाही आवडले तर.. सो सोडून दिला विचार" आर्या म्हणाली.

"बघ बाई, नाहीतर तोच RJ अमेय निघायचा." असे म्हणत स्निग्धाने आर्याला डोळा मारला..

मग दोघीही एकमेकांच्या हातावर टाळी देऊन हसू लागल्या..

संध्याकाळी अनिश आर्याबरोबरच घरी आला.. त्याने साखरपुड्याच्या हॉलबद्दलची सगळी माहिती आर्याच्या बाबांना दिली.. त्याच्या आईबाबांशी ही त्याने याबद्दल डिसकस केल्याचे त्याने

आर्याच्या आईबाबांना सांगितले.. सगळी व्यवस्था आर्या आणि अनिश करणार होते मग काय आर्याच्या आईबाबांनीही मंजुरी दिली व पुढच्या रविवारची साखरपुड्याची तारीख ठरली.

(दुसऱ्या दिवशी सकाळी)

गुड मॉर्निंग, मुंबई.

तुमच्या सर्वांचे स्वागत आहे गुंतता हृदय हे च्या ब्रँड न्यू एपिसोडमध्ये.

अर्थात, मी आहे तुमचा लाडका RJ अमेय..

सो, आज मी तुम्हाला कॉन्टेस्टच्या ५ भाग्यवान विजेत्यांची नावे सांगणार आहे ज्यांना मला भेटायची संधी मिळणार आहे.. तसेच ती कुठे आणि किती वाजता वगैरे वगैरे डिटेल्स तुम्हाला मेसेज द्वारे वा ई-मेल द्वारे सांगण्यात येतील.

(मग अमेय त्या ५ विजेत्यांची नावे सांगतो आणि मग टाळयांच्या कडकडाटाचा आवाज येतो.. )

अमेय पुढे बोलू लागतो..

फ्रेंड्स आता नवरात्री सुरू झाल्या आहेत.. पण तरीही हा पाऊस जायचं नावच घेत नाहीये.. ह्याला नक्की झालाय तरी काय? असाच विचार करताय ना सगळे..

पण तुम्ही कधी विचार केलाय की, कदाचित हा पाऊस कोणासाठी तरी यावर्षी खूप गोड तर कोणासाठी कटू अशा आठवणी घेऊन आला असेल..

असो, प्रेमाचं सुद्धा कसं असतं ना.. मिळालं तर वेळ पटापट निघून जाते.. नाहीतर एक एक क्षण पण एखादं वर्ष असल्यासारखा भासतो.. असे वाटते की....

लगेच गाणं सुरू होतं..

कितीदा नव्याने तुला आठवावे🎶 🎶

डोळ्यातले पाणी नव्याने वाहावे...

कितीदा झुरावे तुझ्याचसाठी,

कितीदा म्हणावे तुझे गीत ओठी,🎶

कितीदा सुकून पुन्हा फुलावे...

किती हाक द्यावी तुझ्या मनाला,🎶

किती थांबवावे मी माझ्या दिलाला,

कितीदा रडुनी जीवाने हसावे... 🎶 🎶

आर्या आणि अनिश, तसेच त्यांच्या घरची मंडळी सगळी जोरदार साखरपुड्याच्या तयारीला लागली..

छोटे इंव्हिटेशन कार्ड अगदी जवळच्या नातेवाईकांसाठी छापले गेले.. बाकी सगळ्यांना व्हाट्सएप व मेसेजच्या माध्यमातून इनव्हाइट करायचे ठरले..

आर्याने आणि अनिशने त्यांच्या त्यांच्या ऑफिसमध्ये ठराविक सहकाऱ्यांना आमंत्रण द्यायचे ठरविले.

बाकी सगळी खरेदी ही आर्या आणि अनिश एकमेकांच्या पसंतीने करत होते..

साखरपुड्याचा दिवस जवळ येत होता.. आर्याच्या साखरपुड्याची बातमी ऐकताच शेखर जे समजायचं ते समजून गेला.. त्याने अनेकदा समीरला कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न केला.. पण काहीच फायदा झाला नाही..

कदाचित समीरने त्याचा नंबर बदलला होता.. मग शेखरने ही समीरचा विषय तात्पुरता सोडून दिला..

इथे साखरपुड्याचा दिवस उजाडला..

आर्या आज खूपच खुश होती.. तिला तिचं पहिलं प्रेम जे मिळत होतं.. सगळ्यांना नाही मिळत पण तिला ते मिळत होतं.. अनिश हेच तर तिचं पहिलं प्रेम होतं.. हो ना??

ठरल्याप्रमाणे सगळेजण हळूहळू हॉलवर येत होते.. आर्या तयार होत होती.. आज ती खूपच सुंदर दिसत होती.. इतकी की, जणू स्वर्गातली अप्सरा..

तिने लाइट गुलाबी रंगाचा लेहेंगा घातला होता त्यावर त्या पेहनाव्याला शोभेल अशी नाजूक आभूषणे घातली होती.. चेहऱ्यावर हलकासा लाइट मेकअप केला होता..

अनिशने सफेद सदरा पायजमा आणि त्यावर गुलाबी मोदी जॅकेट घातलं होतं..

त्या दोघांचा जोडा आज अगदी लक्ष्मीनारायणासारखा दिसत होता.. गोडबोले व जोशी काकू दोघीनी दोघांचीही नजर काढली..

अनिशची नजर आर्याच्या चेहऱ्यावरून हटतच नव्हती..

आर्याची ही परिस्थिती काहीशी तशीच होती..

दोघांनीही एकमेकांकडे बघून स्मित केले.. अनिशने खुणेनेच आर्याला छान दिसतेयस असे सांगितले.. आर्या लाजली.. तिच्या चेहऱ्यावरचा आनंद स्पष्ट दिसत होता..

गोडबोले काकूंनी अनिशच्या आणि जोशी काकूंनी आर्याच्या हातात अंगठी दिली.. दोघांनीही ती एकमेकांच्या बोटात घातली.. सगळ्यांनी टाळ्या वाजविल्या.. मग दोघांचे वेगवेगळ्या पोज मध्ये फोटोग्राफरने फोटो क्लिक केले.. नंतर घरातल्या मंडळींबरोबरही फोटो

क्लिक केले.. मग उपस्थित सर्व पाहुणे एक एक करून आर्या आणि अनिशवर शुभेच्छांचा वर्षाव करत होते..

पण का कोणास ठाऊक, सगळं तर व्यवस्थित चाललं होतं.. म्हणजे नक्की चाललं होतं ना??

आर्याने अनिशच्या कानात काहीतरी सांगितले आणि मग तिने स्निग्धाला रूमकडे येण्याची खुण केली..

"काय झालं आर्या, मधेच का अशी उतरलीस स्टेजवरून? टचअप वगैरे करायचं आहे का? बोलशील" स्निग्धा म्हणाली..

"हे सगळं नीट होतंय ना स्निग्धा.. का कोणास ठाऊक मी काहीतरी खूप मिस् करतेय.. सगळं तर अगदी माझ्या मनासारखं होतंय.. मी ज्याच्यावर प्रेम करते त्याच्याशीच माझा साखरपुडा झालाय.. मी खूप खूप खुश आहे आज.. मी खूपच नशीबवान आहे की, अनिश मला भेटलाय माझा नवरा म्हणून.. पण तरीही... "

स्निग्धा आर्याचं बोलणं मध्येच तोडत म्हणाली,"अग ये बये, तू त्या RJ ला मिस् करत नाहीयेस ना.. हे बघ आर्या तुला काय वाटतं तू एकटीच मुलगी आहेस का.. त्या RJ वर फिदा होणारी.. अशा किती असतील.. आणि त्या RJ च लग्न पण झालं असेल तर.. तू त्याचा विचार फुल डोक्यातून काढून टाक.. मी विनंती करते तुला", स्निग्धा म्हणाली..

इतक्यात बाहेर कसला तरी आवाज ऐकू येत होता.. दोघी रूममधून बाहेर आल्या आणि पाहतात तर स्टेजवर बायकांचा, मुलींचा घोळका दिसत होता.. कोणतरी गर्दीतून म्हणाल, RJ अमेय..

हे ऐकताच आर्या आणि स्निग्धा एकमेकांकडे बघत राहिल्या.. आणि दोघीही स्टेजवर गेल्या.. आर्या गर्दीमध्ये अमेयला बघण्याचा प्रयत्न करत होती.. हे बघताच अनिश म्हणाला, "तू सुद्धा अमेय ची फॅन!!" आणि तो हसू लागला..

अनिशने हाक मारली, "अमेय!!"

अमेय कसाबसा त्या गर्दीतून अनिशजवळ आला..

अनिश अमेयची ओळख आर्याशी करून द्यायला वळला तर आर्या पुटपुटली, "समीर आणि RJ अमेय!!"

**~समाप्त~ पाहिले पर्व**

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. प्रीती सावंत -दळवी यांचं हे दुसरं पुस्तक.**

प्रीती सावंत दळवी गेली अनेक वर्षे कथा लिहीत आहेत. फ़ेसबुकवर त्यांच्या कथांचं वेगळं पेजही आहे. तिथे त्यांचा खास चाहता वर्ग आहे. या चाहत्यांची इच्छा होती की त्यांचं स्वतःचं एक स्वतंत्र पुस्तक व्हावं. पण लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. अशा तरूण लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत.

ई साहित्य प्रतिष्ठान

त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, प्रीती सावंत दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com